40

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** तोफखाना **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0099 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/01/2020 21:59 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 17/01/2020

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/01/2020

**Time From (वेळेपासून):** 15:32 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:44 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/01/2020 **Time (वेळ):** 21:47 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 046 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/01/2020 21:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** सिव्हील हस्पीटवल अनगर ,अनगर

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्रीमती कुमुदिनी जगदिष साळुंके

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पाईप लाईन रोड कौषल्या कालनी, ,अनगर,तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पाईप लाईन रोड कौषल्या कालनी, ,अनगर,तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

Mobile (मोबाइल नं.):

(j) Phone number (फोन नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिल्पा राजेंद्र रेलकर | | | 1. रामुध्था मेडिकल जवळ, नेवासा ज, अनगर,तोफखाना,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 8000 रुपये लाचेची मागणी | 8,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 8,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादअहमदनगर दि. 17/01/2020मी श्रीमती कुमुदिनी जगदिष साळुंके वय 28 वर्ष, धंदा नोकरी ई.सी.जी. तंत्रज्ञ, जिल्हा रूग्णालय, अहमदनगर राहाणार - पाईप लाईन रोड कौषल्या कालनी, अहमदनगर मोबाईल नंबर 7798209829समक्ष फिर्याद देते की, मी वरील पत्यावर पति श्री. राहुल रामभाउ सातपुते यांच्यासह रहाण्यास असुन माझे सासरकडील नांव सौ.कुमुदिनी राहुल सातपुते असे आहे. आज दिनांक 17/01/2020 रोजी मी पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर, अन्टी करप्षन ब्युरो अहमदनगर यांची त्यांचे कक्षात समक्ष भेट घेवुन, माझी ओळख सांगून तक्रार सांगितली की, मी दिनांक 28/8/2017 रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर येथे उपसंचालक, आरोग्य सेवक, नाषिक मंडळ, नाषिक यांचे मार्फतीने सरळसेवेने ई.सी.जी तंत्रज्ञ म्हणुन सेवेत रुजु झाले आहे. माझा एक वर्षे परिविक्षा कालावधी पुर्ण झालेनंतर माझा सेवेत नियमित केल्याचा आदेष काढणे कार्यालयास क्रमप्राप्त आहे. माझा नियमित केल्याचा आदेष अद्याप काढण्यात आलेला नाही किंवा आहे याबद्दल मला ज्ञात नाही, परंतु सदर आदेष मिळणेकरीता पैषाची मागणी होत आहे. तो आदेष काढण्याच्या कामाचा प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य सेवा, नाषिक यांचेकडे पाठविण्याचे कामकाज जिल्हा सामान्य रुग्णालयातील लिपिक श्रीमती रेलकर यांचेकडे आहे. मी वारंवार त्यांचेषी संपर्क करुन प्रस्ताव पाठविणेबाबत विनंती केली, परंतु त्या टाळाटाळ करीत होत्या. त्यानंतर दिनांक 11/01/2020 रोजी मी श्रीमती रेलकर मडम यांची कार्यालयात भेट घेवून माझा सेवा नियमितचा प्रस्ताव पाठविणेबाबत विनंती केली, त्यावेळी त्यांनी प्रस्ताव पाठविणेसाठी 10,000/- रुपये ची मागणी केली. मी त्यांना कषाचे पैसे द्यायचे ? असे विचारले असता त्यांनी ते काम करणेसाठी द्यावे लागतात असे म्हणुन माझेकडे 8000/- रुपये तडजोडीअंती मागणी केली व पैसे दिलेनंतर आठ दिवसांत आर्डर देईन असे म्हणाल्या. श्रीमती रेलकर यांनी मागितलेली रक्कम लाच आहे व मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. मी आज श्रीमती रेलकर यांची भेट घेणार आहे व माझे सेवा नियमितेचा प्रस्ताव पाठविणेबाबत विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कायदेषीर कारवाई करावी. श्रीमती रेलकर यांचेषी माझा कुठल्याही प्रकारचा आर्थिक देणे घेण्याचा अगर उधार उसनवारीचा व्यवहार नसून भांडणतंटा नाही अषी तोंडी हकीगत कथन केली. त्यावर पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांनी पोलीस निरीक्षक श्री पवरे व कार्यालयात उपस्थित पंच कर्मचारी 1) श्रीमती नम्रता वसंत सोनवणे, कर निरीक्षक 2) श्री विनोद भागचंद पडवळ, कर सहायक दोन्ही नेमणुक वस्तु व सेवा कार्यालय, अहमदनगर तसेच अन्टी करप्षन ब्युरो कार्यालयातील महिला पोलीस कर्मचारी श्रीमती राधा खेमनर यांना त्यांच्या कक्षात बोलावून घेवून माझी त्यांचेषी व त्यांची माझेषी ओळख करुन दिली. तसेच पंच कर्मचारी यांना माझे तक्रारीचे अनुषंगाने करावयाचे कारवाई मध्ये पंच म्हणुन काम करण्यास तयार असलेबाबत संमती घेवून पंचांना माझे नाव, पत्ता विचारुन माझी तक्रार विचारण्यास सांगितली. पंचानी विचारले प्रमाणे मी माझे वरीलप्रमाणे नाव पत्ता सांगून वर तोंडी



Scanned with CamScanner

कथन केलेप्रमाणे माझी तक्रार सांगितली. त्यावर पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांनी पोलीस निरीक्षक श्री पवरे यांना पुढील कायदेषीर कारवाई करणेबाबत आदेषित केले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री पवरे यांनी मला माझी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून देणेबाबत कळविले असता मी माझे हस्ताक्षरात माझी वर कथन केले प्रमाणे तक्रार लिहुन देवुन त्यावर सही केली. त्यानंतर मी दिलेली लेखी तक्रार दोन्ही पंचानी व पोलीस निरीक्षक श्री पवरे यांनी वाचून पाहून ती बरोबर असल्याची खात्री करून त्यावर त्यांनी सहया केल्या.त्यानंतर मी श्रीमती रेलकर यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाच मागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस निरीक्षक, श्री पवरे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकार्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याचे वापराबाबत व हातळणीबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री पवरे यांनी व्हाईस रेकार्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकार्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकार्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक, श्री पवरे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 श्रीमती सोनवणे यांना सुचना समजावुन सांगितल्या. मी श्रीमती रेलकर यांची जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर कार्यालय येथे भेट घेणार असल्याने पोलीस निरीक्षक श्री पवरे यांनी उपस्थित महिला पोलीस कर्मचारी श्रीमती राधा खेमनर यांना सुचना देवून व्हाईस रेकार्डर चालू करुन माझे गळ्यात आडकवुन ब्लाऊजच्या आत ठेवुन पंच नंबर 1 श्रीमती सोनवणे यांचेसह माझी स्कुटी पेप दुचाकीवर रवाना केले. मी पंच नंबर 1 श्रीमती सोनवणे यांना माझे दुचाकीवरून घेवून जिल्हा सामान्य रुग्णालय येथे जावून श्रीमती रेलकर लिपीक यांची भेट घेतली. मी श्रीमती रेलकर लिपीक यांचेशी माझे सेवा नियमिततेच्या प्रस्तावाबाबत बोलणे केले असता श्रीमती रेलकर मडम यांनी मला तुम्ही जेव्हा पेमेंट द्याल, त्यानंतर आठ दिवसांत भेटून जाईल असे म्हणून माझेकडे लाचेची मागणी केली. मी त्यांना लवकर करा, होमलोनचे काम आहे असे सांगितले असता श्रीमती रेलकर मडम यांनी तुम्ही लवकर दिले तर मी लवकर करुन देईल, तुम्ही सगळयांना विचारा, वाटल तर पंधरा, वीस, पंचवीस जस असल तसं, एक रुपया पण कमी नाही अन एक रुपया पन जास्त नाही सांगितला, इथला टेबल म्हणजे स्वतः वैयक्तिक पाचषे रुपये सुध्दा मी नाही ठेवत, आता तर भाव वाढले मडम असे म्हणुन माझेकडे 8000/- रुपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम बंद पाकिटात त्यावर नाव टाकून देण्यास सांगितल्याने मी त्यांना चारच्या ओ.पी.डी ला येते, तेव्हा देते असे सांगून अन्टी करप्षन ब्युरो कार्यालय, अहमदनगर येथे माझे दुचाकीवर पंच नंबर 1 श्रीमती सोनवणे यांचेसह निघुन आले. त्यानंतर तेथे पोलीस निरीक्षक श्री पवरे यांनी महिला पोलीस कर्मचारी श्रीमती राधा खेमनर यांचेकरवी माझ्या कडील व्हाईस रेकार्डर ताब्यात घेवुन तो बंद केला. त्यानंतर पंच नं. 1 श्रीमती सोनवणे यांना माझे सोबत श्रीमती रेलकर यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येईपर्यन्तच्या हकीकतीबाबत विचारता, त्यांनी मी वरिल प्रमाणे सांगितलेले हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री पवरे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकार्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभा ाषण ऐकुन ते मी व पंच नं. 1 यांनी कथन केले हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करून त्याचा उतारा तयार केला. श्रीमती रेलकर यांनी माझ्याकडे स्पष्टपणे लाचेची मागणी केली असल्याने त्यांचे विरूध्द लाचेची सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री पवरे यांनी मला श्रीमती रेलकर यांना लाच म्हणुन देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील उत्पनातील 8000/- रूपये, त्यात 2000/- रू दराचे 04 चलनी नोटा असे समक्ष हजर केले. सदर नोटांचे नंबर्स को-या कागदावर लिहून घेतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. पवरे यांनी कार्यालयातील एक पांढ-या रंगाचे कागदी पाकीट उपलब्ध करून घेतले. त्यापाकीटावर मी माझे हस्ताक्षरात श्रीमती साळुंके के.जे., ई. सी.जी.तंत्रज्ञ असे लिहीले. त्यानंतर अन्थ्रासिन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना व कागदी पाकीटास पोलीस नाईक चैधरी यांनी अन्थ्रासिन पावडर लावली व सदरच्या नोटा पांढ-या रंगाच्या पाकीटात ठेवून ते नोटांचे पाकीट माझे अंगात नेसण्यास असलेल्या अप्रानच्यां समोरील उजव्या बाजुच्या खिषात ठेवुन दिले. तसेच त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला सापळया दरम्यान करावयाचे कारवाई बाबत सुचना देण्यात आल्या व सर्व कायदेषीर कारवाई करण्यात आली. त्यानंतर व्हाईस रेकार्डर मध्ये नविन मेमरीकार्ड घालुन त्यात काहीएक ध्वनीमुद्रीत नसल्याचे माझी व पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर माझेकडे व्हाईस रेकार्डर देवून, मला पंच नं. 1 श्रीमती सोनवणे यांचेसह श्रीमती रेलकर यांची भेट घेण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर येथे जाण्यासाठी दुपारी 03/21 वा सुमारास माझे दुचाकी स्कुटी वरून रवाना केले. माझे पाठोपाठ पो.नि.श्री.पवरे, पंच नं. 2 व सापळा पथक आले. आम्ही जिल्हा सामान्य रूग्णालय, अहमदनगर कार्यालयात गेलो. कार्यालयीन कक्षातून समोरूनच श्रीमती रेलकर मडम येताना दिसल्या. त्यांनी मला या इकडे असे सांगुन त्यांच्या मागे येण्याचा इषारा करीत त्यांच्या टेबलाच्या पष्चिमेस असलेल्या खोलीत घेवून आल्या व तेथे पाकीट केलं? असे म्हणून लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी माझे अंगातील अप्रानचे समोरील उजवे खिशातील लाचेच्या नोटा असलेले पाकीट काढून, त्यांचे समोर धरले व पाकीट केलय, मोजुन घ्या असे म्हणाले. त्यावेळी श्रीमती रेलकर यांनी ते लाचेच्या नोटा असलेले पाकीट उजवे हाताने स्विकारून, त्यातील नोटा काढून, त्या दोन्ही हाताने मोजल्या व आठ आलेत असे म्हणाल्या. श्रीमती रेलकर यांनी पुन्हा लाचेच्या नोटा त्या पाकीटात ठेवल्या. त्यानंतर येवून त्या त्यांचे टेबलाचे ठिकाणी असलेल्या खुर्चीत बसल्या व लगत असलेल्या लोखंडी कपाटात लाचेच्या नोटांचे पाकीट ठेवले. त्यानंतर मी मोबाईलचा बहाना करून, कार्यालयाचे बाहेर येवुन माझा डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवुन लाच स्विकारलेचा पुर्व नियोजीत इशारा केला. ती वेळ सुमारे दुपारी 3/32 वा.ची होती. तो इषारा पाहुन पोलीस उप अधिक्षक श्री.खेडकर,पो.नि.पवरे,पो नि करांडे व सापळा पथक असे माझ्याजवळ आले. पो.नि पवरे यांनी माझेकडून व्हाईस रेकार्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर श्रीमती रेलकर यांना रंगेहाथ पकडुन त्यांचे ताब्यातील लोखंडी कपाटातून लाचेची रक्कम असलेले पाकीट हस्तगत करण्यात आले. तेथे कार्यालयातील एका कक्षामध्ये आवष्यक त्या तपासण्या केल्या. माझे हाताची व अंगातील अप्रानची तपासणी करण्यात आली. त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कायदेषीर कामकाज अन्टी करप्षन ब्युरो,अहमदनगर कार्यालय येथे करण्यात आले. तरी यातील लोकसेवक षिल्पा राजेंद्र रेलकर, वय 41 वर्ष, धंदा नोकरी, कनिष्ठ लिपिक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर हल्ली रा. शासकीय निवासस्थान खोली नंबर 4, पत्रकार चैक, अहमदनगर मुळ रा.मुथ्था मेडिकल जवळ, नेवासा जि.अहमदनगर यांनी माझा सेवा नियमितीचा प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य सेवा, नाषिक यांचे कार्यालयाकडे पाठवून, माझे सेवा नियमितीचा आदेश काढण्या करीता आज दि.17/01/2020 रोजी करण्यात आलेल्या लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान पंच नं. 1 श्रीमती सोनवणे यांचे समक्ष जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर येथील कार्यालयात माझेकडे पंचा समक्ष 8,000/-रूपये लाचेची मागणी करून, सदर लाचेची रक्कम पंच नं. 1 श्रीमती सोनवणे यांचे समक्ष आज दि.17/01/2020 रोजी आयोजित लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान दुपारी 3/32 वा. सुमारास जिल्हा सामान्य रुग्णालयातील कार्यालयात स्विकारली. म्हणून माझी लोकसेवक श्रीमती षिल्पा राजेंद्र रेलकर वय 41 वर्ष, धंदा नोकरी, कनिष्ठ लिपिक, जिल्हा सामान्य रुग्णालय, अहमदनगर यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष हे लिहुन दिले,



Scanned with CamScanner

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Harun papamiya Mulani(I (Inspector)) / PI or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14.Signature/Thumb Impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Batpute

15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ना. अंमलदार
तोफखाना पो.स्टे.

Signature of Officer in charge, Police Station (... अधिका-याची
Name (नाव): Harun papamiya Mulani
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI



Scanned with CamScanner